असा. क्र. २२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५



# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, मे ४, २००५/वैशाख १४, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**


पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**—महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. ३१७-३१८


दिनांक ३ मे २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७६ चा महा. ३८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र पाटबंधारे (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याचे कलम २ मधील, खंड (७) मध्ये "स्थापन केलेली कंपनी" या मजकुरानंतर, "असा असेल आणि त्यामध्ये, कोणत्याही उक्त प्रयोजनासाठी राज्य शासनाशी करार केलेला खाजगी विकासक किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याखाली नोंदणी केलेली सहकारी संस्था, यांचाही समावेश होईल ;" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१९७६ चा महा. ३८.

१९६१ चा महा. २४.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई